ePaper

║ वर्ष - 8 ।अंक -83 ║UDYAM-MH-26-0158827║

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 30 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## विधानसभा निवडणुकीआधीच शिवसेना-भाजप युतीमध्ये वाद



**आतील पानांत**

- ब्रुकने मोडला 'विराट'चा वर्ल्ड रेकॉर्ड
- भारत-बांगलादेश कसोटी सामना ड्रॉ ?
- पाकिस्तान कर्माची फळं भोगतोय
- सामंत सलग पाचव्यांदा गड राखणार?

# सोसायटीधारकांच्या पाणी पुरवठाबाबत प्रशासनाचा "वॉच"!

## नियमभंग करणाऱ्या व्हॉल्व्हमनवर आता होणार कारवाई

### आमदार महेश लांडगे यांच्या बैठकीनंतर कार्यवाही

। पिंपरी ।महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडून नागरिकांसाठी मुबलक पाणी मिळावे यासाठी पाण्याच्या टाक्या बांधण्यात आल्या आहेत. त्यामधून शहरात पाण्याचे वितरण करण्यासाठी व्हॉल्व ऑपरेटर/पंप ऑपरेटर (मजूर) यांची पंप चालविण्यासाठी परिचाल ठेकेदाराकडून नियुक्ती करण्यात आली आहे.**





शहरातील विविध भागामध्ये पाणी वितरणाबाबत नागरिकांना समस्यांना सामोरे जावे लागत असल्याच्या तक्रारींचा महापालिकेने गांभिर्याने विचार करीत गुरुवार, दि. २६ सप्टेंबर रोजी महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी पाणीपुरवठा विभागातील सर्व कर्मचारी आणि कंत्राटदारांना बैठकीमध्ये मार्गदर्शन केले असून, पाणीपुरवठ्यामध्ये विभागाने नियुक्त केलेल्या व्हॉल्व ऑपरेटर/पंप ऑपरेटर (मजूर) यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पथकाची नेमणूक करावी, अशा सूचनासुध्दा दिल्या. याचबरोबर, पाणी वितरणामध्ये सहभागी कोणतीही व्यक्ती अथवा कंत्राटदार यांनी नियमभंग केल्यास संबंधित व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही नमूद केले.

पाणीपुरवठा विभागाकडून पाणी वितरणावर लक्ष ठेवण्यासाठी कार्यप्रणाली तयार केली आहे. काही दिवसांपूर्वी चिंखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून "संवाद सोसायटीधारकांचा" हा कार्यक्रम घेतला होता.

त्यावेळी आमदार महेश लांडगे आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यासमोर सोसायटीधारकांनी पाणी समस्यांबाबत गाऱ्हाणे मांडले होते. त्यानंतर प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्यास सुरूवात केली आहे. आगामी काळात

> "पाणी वितरणामध्ये जे व्यक्ती किंवा कंत्राटदार नियमभंग करतील अशा महापालिकेचा कर्मचारी असेल तरी त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. पाणी वितरणासाठी नियुक्त केलेल्या व्हॉल्व ऑपरेटर (मजूर) यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आम्ही एक कार्यप्रणालीचा अवलंब केला असून त्याद्वारे इथून पुढे पाणी वितरणाचे काम करण्यात येणार आहे. आम्ही सर्व नागरिकांना न्याय्य पाणी वितरण करण्यासाठी आग्रही असून त्यासाठी कटिबद्ध आहोत.
>
> **–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड.

> महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने व्हॉल्व ऑपरेटर (मजूर) यांच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी एका पथकाची नेमणूक केली असून त्याद्वारे पाणी वितरणामध्ये कोणतीही कमी राहणार नाही. नव्या कार्यप्रणालीच्या माध्यमातून नागरिकांना तक्रारीची संधी न देण्याचा आमचा प्रयत्न आहे.
>
> **–प्रदीप जांभळे पाटील,** अतिरिक्त आयुक्त (1), पिंपरी – चिंचवड महानगरपालिका.

### व्हॉल्व ऑपरेटर (मजूर) यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पथकाची नेमणूक...

व्हॉल्व ऑपरेटर (मजूर) यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये, क्षेत्रीय कार्यालयातील पाणीपुरवठा विभागातील उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, एक व्हॉल्व ऑपरेटर (मजूर) असणार आहे. सदर पथकावर क्षेत्रीय कार्यालयातील पाणीपुरवठा विभागातील उपअभियंता यांचे नियंत्रण राहणार आहे.

### नेमलेले पथक अशी करणार तपासणी...

पथक प्रत्येक पाणीपुरवठा टाकी येथे प्रत्यक्ष जाऊन टाकी वेळापत्रकानुसार वेळेवर भरली अथवा नाही किंवा दिलेल्या वेळापत्रकानुसार पाणीपुरवठा करण्यात येतो किंवा नाही याची तपासणी करणार आहे. त्याबरोबर, व्हॉल्व ऑपरेटर (मजूर) यांची हजेरी तपासून त्यांनी गणवेश, ड्रेस कोड, ओळखपत्र परिधान केले किंवा नाही याची तपासणी करण्यात येणार असून व्हॉल्व ऑपरेटर (मजूर) यांचे कामकाजाचे रजिस्टर तपासून पथकाकडून स्वाक्षांकित करण्यात येणार आहे. मीटर रिडींग व क्वालिटी अनालायजरचे रिडींग तपाण्यात येणार आहे. त्याचबरोबर, पाण्याच्या टाकीवरुन पाणी पुरवठा करण्यात येणाऱ्या विविध भागातील व्हॉल्व ऑपरेशन (काही ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन) दिलेल्या वेळापत्रकानुसार होते आहे की नाही याची सुध्दा तपासणी तपासण्यात येणार आहे.

### दर सोमवारी सादर करण्यात येणार अहवाल...

पाणी पुरवठा विभागाने व्हॉल्व ऑपरेशनसाठी नेमलेल्या पथकाचा अहवाल कनिष्ठ अभियंता व उपअभियंता संबंधित कार्यकारी अभियंता यांना दर आठवड्याच्या सोमवारी अहवाल सादर करणार आहेत. संबंधित पथकातील अधिकाऱ्यांनी एका आठवड्यात एका प्रभागातील पाण्याच्या सर्व टाक्यांना भेट देणे आवश्यक असणार आहे.

पाणी पुरवठ्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांना आता 'रिझल्ट' दाखवावा लागणार असून, राजकीय लागेबांधे आहेत.

त्यातून पाणी पुरवठ्यामध्ये भेदभाव केल्यास कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. आगामी काळात पाणी वितरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पाणी पुरवठा विभागाने एका नव्या कार्यप्रणाली स्वीकारली असून त्याद्वारे व्हॉल्व ऑपरेटर (मजूर) यांच्यावर एका पथकाचे नियंत्रण राहणार आहे. त्याबरोबरच त्याचा अहवाल सुद्धा दर आठवड्याला विभागाला सादर करावा लागणार आहे.

# जागा वाटपात डावे पक्ष, संघटना दुर्लक्षित!

## डावे पक्ष, संघटनांनी दिला महाविकास आघाडीला गंभीर इशारा



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने १२ जागांची मागणी महाविकास आघाडीकडे केली आहे. पण, आमच्या मागणीकडे लक्ष न देताच महाविकास आघाडीतील घटक पक्षांची जागा वाटपाची चर्चा सुरू आहे. हा प्रकार महाविकास आघाडीच्या एकजुटीसाठी घातक आहे, असा इशारा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने (माकप) दिला आहे.**

पक्षाची भूमिका मांडताना डॉ. अजित नवले म्हणाले, माकप व जनसंघटनांचे चांगले काम असलेल्या, प्रदीर्घ आणि यशस्वी लढे दिलेल्या ठिकाणच्या जागांची मागणी केली आहे. आमची मागणी मर्यादित जागांची असून, आम्ही आमच्या मागणीवर ठाम आहोत. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद पवार, जयंत पाटील, उद्धव ठाकरे, नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांची भेट घेऊन या बाबत आपली भूमिका दोन महिन्यांपूर्वीच स्पष्ट केली होती. पक्षाच्या वतीने लढणार असणाऱ्या १२ जागांची यादी या सर्व नेत्यांना त्यावेळीच लिखित स्वरुपात सादर केली होती. महाविकास आघाडीने या १२ जागा माकपला सोडाव्यात व त्यानंतरच उर्वरित जागांची बाबत आपसात वाटाघाटी कराव्यात, अशी मागणी केली होती. पण, महाविकास आघाडीतील प्रमुख तीन पक्ष माकप व डाव्या पुरोगामी शक्तींना गृहीत धरून जागा वाटपाबाबत आपसात चर्चा करत आहेत. इतर डावे पक्ष व पुरोगामी शक्तींना अद्याप या प्रक्रियेत सामावून घेण्यात आल्याचे दिसत नाही. महाविकास आघाडीच्या अंतर्गत एकजुटीसाठी हे घातक आहे.लोकसभा निवडणुकीमध्ये सुद्धा महाविकास आघाडीने लोकसभेच्या महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व ४८ जागा तीन मुख्य पक्षांमध्ये वाटून घेतल्या व त्यानंतर इतर पक्षांच्या बरोबर त्यांचा केवळ पाठिंबा मिळवण्यासाठी चर्चा केली. माकपने तेव्हाही महाविकास आघाडीच्या प्रमुख पक्षांचे हे असे करणे चुकीचे असल्याबद्दल आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांच्या लक्षात आणून दिले होते. किमान विधानसभेच्या जागा वाटपात तरी अशा प्रकारे आपसांत तीन पक्षांनी जागा वाटून घेऊन नंतर डावे पुरोगामी पक्ष व संघटनांबरोबर चर्चा सुरू करण्याची चूक होणार नाही याची काळजी घेण्याबद्दल विनंती केली होती. मात्र, लोकसभेच्या वेळेस जे झाले तेच विधानसभेच्या वेळेस घडताना दिसत आहे. दुसऱ्या बाजूला हे प्रमुख तीनही पक्ष वेगवेगळ्या संवाद यात्रा, सभा व प्रसार माध्यमांमधील चर्चेच्या माध्यमातून माकपने व इतर डाव्या पक्षांनी लढवण्यासाठी सादर केलेल्या जागांवर आपले उमेदवार प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे केंद्रस्थानी आणत आहेत. महाविकास आघाडीतील या तीन पक्षांची ही कृती समन्वयाच्या व एकजुटीच्या प्रक्रियेस बाधा आणणारी आहे, असेही नवले म्हणाले.विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रातील सर्व डावे व लोकशाहीवादी पक्ष व पुरोगामी संघटनांच्या मागण्यांचा महाविकास आघाडीने तातडीने विचार करावा. महाविकास आघाडीने सर्वसमावेशक भूमिका घ्यावी. जागा वाटपाच्या चर्चेत आम्हाला सहभागी करून न घेतल्यास होणाऱ्या नुकसानीस आघाडी जबाबदार असेल, अशा इशारा माकपचे राज्य सचिव डॉ. उदय नारकर यांनी दिला आहे. पक्षाची भूमिका मांडताना डॉ. अजित नवले म्हणाले, माकप व जनसंघटनांचे चांगले काम असलेल्या, प्रदीर्घ आणि यशस्वी लढे दिलेल्या ठिकाणच्या जागांची मागणी केली आहे. आमची मागणी मर्यादित जागांची असून, आम्ही आमच्या मागणीवर ठाम आहोत.

### आपसात चर्चा करत आहेत

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या शिष्टमंडळाने महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते शरद पवार, जयंत पाटील, उद्धव ठाकरे, नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांची भेट घेऊन या बाबत आपली भूमिका दोन महिन्यांपूर्वीच स्पष्ट केली होती. पक्षाच्या वतीने लढणार असणाऱ्या १२ जागांची यादी या सर्व नेत्यांना त्यावेळीच लिखित स्वरुपात सादर केली होती. महाविकास आघाडीने या १२ जागा माकपला सोडाव्यात व त्यानंतरच उर्वरित जागांच्या बाबत आपसात वाटाघाटी कराव्यात, अशी मागणी केली होती. पण, महाविकास आघाडीतील प्रमुख तीन पक्ष माकप व डाव्या पुरोगामी शक्तींना गृहीत धरून जागा वाटपाबाबत आपसात चर्चा करत आहेत.

# पामतेलाच्या दराचा भडका, आयातीचे सौदे रद्द

## दरवाढ, तेलाचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता नाही

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतातील खाद्यतेलाच्या आयातदारांनी पामतेलाच्या वाढलेल्या दराचा फायदा घेण्यासाठी पामतेल आयातीचे सुमारे एक लाख टनाचे सौदे रद्द करून परस्पर अन्य देशांना, व्यापाऱ्यांना विकले आहेत.**

सौदे रद्द झाले तरीही ऐन दिवाळीत तेलाची दरवाढ होण्याची किंवा तेलाचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता नाहीद सॉल्व्हेंट एक्स्ट्रॅक्टर्स असोशिएसनचे (एसईए) कार्यकारी अध्यक्ष डॉ.भारत मेहता म्हणाले, भारताने खाद्यतेलाच्या आयात शुल्कात वाढ केली आहे. इंडोनेशिया पामतेलाचा सर्वात मोठा उत्पादक आहे, पण, इंडोनेशियात पामतेलाचे उत्पादन घटले आहे,धोरणांतर्गत पामतेलापासून बायोडिझेल तयार करण्यावर भर दिला आहे. दुसऱ्या क्रमांकाचा पामतेल उत्पादक असलेल्या मलेशियाने वाढविलेल्या निर्यात शुल्कामुळे जागतिक बाजारात पामतेलाच्या दरात वाढ झाली आहे.देशातील बंदरावर विविध देशातून आयात होणाऱ्या तेलामध्ये पामतेल सर्वात स्वस्त दराने आयात होत असते. भारताने आयात शुल्क वाढविण्यापूर्वी जुलै महिन्यात कच्चे पामतेल ९७९ डॉलर प्रतिटन दराने आयात होत होते. सध्या १०११ डॉलर प्रतिटन दराने आयात होत आहे. पामतेलापेक्षा चांगला दर्जा आणि आरोग्यदायी असलेले कच्चे सोयाबीन १०१५ डॉलर प्रतिटन दराने आणि सूर्यफूल तेल १०१९ डॉलर प्रतिटन दराने आयात होत आहे. जुलै महिन्यात कच्चे सोयाबीन १०५४ आणि कच्चे सूर्यफूल तेल १०४३ डॉलर दराने आयात होत होते. सूर्यफूल तेल सर्वात महाग दराने आयात होते. सध्या कच्चे पामतेल, सोयाबीन तेल आणि सूर्यफूल तेलाच्या दरात फारसा फरक नाहीपामतेलाची आयात कमी करून सोयाबीन आणि सूर्यफूल तेलाची आयात करीत आहेत..



### तेलाच्या दरात फारसा फरक नाही

पामतेल आयातीचे सौदे रद्द केले आहेत, हा व्यापाराचा एक भाग आहे. सध्या पामतेल, सोयाबीन तेल आणि सूर्यफूल तेलाच्या दरात फारसा फरक राहिलेला नाही. त्यामुळे व्यापारी सोयाबीन तेल आणि सूर्यफूल तेल आयात करीत आहेत. देशात खाद्यतेलाचा पुरेसा साठा आहे, तसेच देशात उत्पादित झालेल्या तेलबियांचे गाळपही सुरू होईल. त्यामुळे दिवाळीत टंचाई किंवा दरवाढ होण्याची शक्यता नाही, अशी माहिती शेतीमाल बाजार व्यवस्थेचे अभ्यासक श्रीकांत कुवळेकर यांनी दिली.भारतातील खाद्यतेलाच्या आयातदारांनी पामतेलाच्या वाढलेल्या दराचा फायदा घेण्यासाठी पामतेल आयातीचे सुमारे एक लाख टनाचे सौदे रद्द करून परस्पर अन्य देशांना, व्यापाऱ्यांना विकले आहेत.

## अजितदादांच्या राष्ट्रवादीत चाललंय काय?

# चिंचवडला 4 दिवसांत 2 गटांची बंडाळी!

### पिंपरीत अजितदादांना दुसरा धक्का; भाऊसाहेब भोईर उतरणार विधानसभेच्या रिंगणात

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील विधानसभा निवडणुका येत्या काळात कोणत्याही क्षणी जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविकास आघाडी व महायुतीच्या जागावाटपाची चर्चा सध्या सुरु आहे. तोंडावर आलेल्या विधानसभेच्या जागावाटपावर चर्चा करण्यासाठी महायुती व महाविकास आघाडीकडून जागावाटपासाठी जोरबैठका सुरु आहेत. त्यातच आता अजित पवार यांचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या पिंपरी चिंचवडमध्येच आणखी एक मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. पिंपरी चिंचवड शहरातील अजित पवारांचे खंदे समर्थक असलेले माजी ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर हे येत्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस सोडत चिंचवड विधानसभा निवडणूक लढणार आहेत. माझे सर्वच पक्षातील लोकांशी चांगले संबंध आहेत. माझ्यासोबत सर्वच पक्षातील जवळपास 30-40 नगरसेवक आहेत. त्यामुळे माझा मालक आता अजित पवार यांचा पक्ष नसून, माझा मालक आता पिंपरी चिंचवड शहरातील जनताच आहे, अशी भूमिका भोईर यांनी घेतली आहे.**



काही दिवसापूर्वी अजित गव्हाणे यांच्यासह काही नगरसेवकांनी तुतारी हाती घेतली होती. त्यानंतर आता एक अजित पवार यांचा खंदा समर्थक असलेले ज्येष्ठ नगरसेवक विधानसभेची जोरदार तयारी करीत आहेत. आगामी काळात होत असलेल्या विधानसभा निवडणुकीत ते चिंचवड मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची तयारी करीत असल्याचे समजते.

येत्या काळात भोईर हे येत्या 2 ऑक्टोबरला महानिर्धार मेळावा घेऊन पुढची भूमिका जाहीर करणार असल्याचा इशारा भाऊसाहेब भोईर यांनी दिला आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील सांस्कृतिक जाण असलेले व्यक्तीमत्व अशी भाऊसाहेब भोईर यांची पिंपरी चिंचवड शहरात प्रतिमा आहे. त्यामुळे आगामी काळात होत असलेल्या मेळाव्यात ते काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

भाऊसाहेब भोईर यांनी रविवारी पिंपरी चिंचवड शहरात घेतलेल्या पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी पिंपरी चिंचवड शहरातील भ्रष्टाचार, घराणेशाही आणि दडपशाही विरोधात मी विधानसभा निवडणूक लढणार असल्याचे भोईर यांनी स्पष्ट केले.

अजितदादांच्या अत्यंत विश्वासातील, अशा चार मातब्बर माजी नगरसेवकांनी 25 तारखेला पत्रकार परिषद घेऊन त्यांना पहिला 'जोर का धक्का' दिला. त्याद्वारे त्यांनी भाजपचे आमदार असलेला शहरातील चिंचवड विधानसभा मतदारसंघ पक्षाकडे घेत, तिथं नवीन चेहरा (म्हणजे त्यांच्या गटातील) उमेदवार देण्याची मागणी केली. अन्यथा 'तुतारी' फुंकणार असल्याचा इशारा दिला.

दरम्यान, चार दिवसांत त्यांना पक्षातील आणखी काही माजी नगरसेवकांची साथ मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास भलताच वाढला आहे. त्यानंतर पक्षातील ज्येष्ठ नेते आणि माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनीही आज पत्रकार परिषद घेऊन बंडाचा इशारा दिला. यातून अजितदादांची त्यांच्यात आवडत्या शहरात 'दादा'गिरी कमी झाली की काय? अशी चर्चा शहरात सुरु झाली आहे. तसंच त्यांच्या पक्षात त्यातही चिंचवडमध्ये चाललंय, तरी काय? अशी विचारणा होऊ लागलीय.

#### भोईर यांचा 'निश्चय' अन् 'कार्यक्रम'

आतापर्यंत आपल्यावर फक्त अन्यायच झाला असल्याने आता आपण चिंचवड विधानसभा कुठल्याही परिस्थिती लढणार असल्याचा निर्धार माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनी बोलून दाखवला. जेव्हा जेव्हा आपण आमदार होण्याचा निश्चय केला, तशी चर्चा झाली, फ्लेक्स लागले, तेव्हा तेव्हा सर्वांनी मिळून आपला 'करेक्ट' कार्यक्रम केला, अशी खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.

#### भोईर यांचे पत्ते अजून 'क्लोज'च

दरम्यान, चार दिवसांपूर्वी अजितदादांना आव्हान दिलेल्या त्यांच्या चार नगरसेवकांनी 'तुतारी' फुंकणार असल्याचे संकेत दिले आहेत. मात्र,त्यांच्यासारखाच बंडाचा इशारा दिलेल्या भाऊसाहेब भोईर यांनी, मात्र लगेच आपले पत्ते ओपन केलेले नाहीत. त्यामागे त्यांना विधानपरिषदेचे मिळण्याचे गणित असण्याची शक्यता आहे. 2 ऑक्टोबरला सायंकाळी आपल्या कार्यकर्त्यांच्या महानिर्धार मेळाव्यात आपली भूमिका स्पष्ट करू, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे ते 'पेटती मशाल' हाती घेणार की 'तुतारी' फुंकणार, याकडे लक्ष लागले आहे.

---

## 'संविधान भवन' जनजागृती : आ. महेश लांडगे यांनी व्यक्त केली दिलगिरी!

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोखाली नाव छापल्याने विरोधकांचे राजकारण

।पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून आम्ही महाराष्ट्रातील पहिले संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्याची जनजागृती करण्यासाठी काही रिक्षाचालक व हितचिंतकांनी आपल्या रिक्षांवर हुड फलक लावले आहेत. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्राखाली नजरचुकीने माझ्या नावाचा फाऊंट छापण्यात आला आहे. सदर रिक्षा हुडवरील फलकांमुळे समाजबांधवांच्या भावना दुखावल्या आहेत. त्याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करतो, अशी भूमिका आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली आहे.**






पिंपरी-चिंचवडमध्ये भारतातील पहिले संविधान भवन उभारले जात आहे. या पार्श्वभूमीवर जनजागृती करण्यात येत असून, रिक्षा चालकांकडून रिक्षा हुडवर छावलेल्या बॅनरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्राखाली महेश लांडगे यांचे नाव छापलेला फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यामुळे शहरातील विरोधी राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते यांनी समाजमांध्यमांमध्ये टिका-टिपण्णी करुन सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान, आमदार महेश लांडगे यांनी सोशल मीडियाद्वारे पिंपरी-चिंचवडकरांशी संवाद साधला. यामध्ये महेश लांडगे म्हणाले की, राजकीय उद्देशाने काही व्यक्ती संबंधित रिक्षांवरील हुड बॅनरबाबत समाजामध्ये गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे सबंधित रिक्षांवरील जनजागृतीचे हुड काढावेत, असे आवाहन रिक्षाचालक व माझ्या सहकारी-हितचिंतकांना करीत आहे.

#### काय म्हणाले आहेत महेश लांडगे वाचा...

अखंड भारताचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, युगपुरुष महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीमाई फुले, राजर्षी शाहू महाराज अशा कित्येक थोर महामानवांच्या योगदानामुळेच आपला हा महाराष्ट्र आज प्रगतीपथावर अग्रेसर आहे.. पण आजही स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी काही राजकीय समाजकंटक जातीय धार्मिक तसेच भावनिक तेढ निर्माण करून आपला सामाजिक सलोखा बिघडविण्याचा प्रयत्न करत असतात.. असाच काहीसा प्रकार काल माझ्या कानावर आला...विश्वरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला दिलेल्या सर्वश्रेष्ठ संविधानाच्या विचारांनी समृद्ध असलेले देशातील सर्वात पहिले भव्य असे संविधान भवन आपण आपल्या शहरात उभारत आहोत, त्यासाठी मी प्रयत्नशील आहे, लवकरच या संविधान भवनाचे कामही सुरू होणार आहे.. याबाबतीत माहिती देणारे रिक्षा हुड एका रिक्षाचालकाने आपल्या रिक्षावर बसवले.. त्यावर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या खालच्या भागात अनावधानाने व नजरचुकीने माझे नाव छापले गेले होते.. यामध्ये कुणाचीही भावना दुखावण्याचा हेतू मुळीच नव्हता..! पण तरीही विरोधकांनी त्या रिक्षाच्या हुड चे फोटो समाजमाध्यमांमध्ये पसरवून 'मी माझी सही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेवर लावली अशी खोटी आणि संतापजनक बातमी व सोशल मीडिया पोस्ट व्हायरल केली.

मुळात संबंधित रिक्षा हुड वर माझी सही किंवा स्वाक्षरी नसून तो फक्त नावाचा फॉन्ट आहे.. पण तरीही विरोधक महाविकास आघाडीच्या समाजकंटकांनी सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला.. या प्रकाराबाबत मला जेव्हा माहिती कळाली तेव्हा संबंधित रिक्षाचालकांना बोलावून त्यांना सदर हुड काढण्याची विनंती आम्ही केली, त्यांनीदेखील ते रिक्षा हुड तात्काळ काढून सहकार्य केले. हा सर्व प्रकार अनावधानाने घडला असून त्याबद्दल मी सर्व नागरिकांची मनापासून दिलगिरी व्यक्त करतो, या प्रकारामध्ये कुणाच्याही भावना दुखावण्याचा अजिबात हेतू नव्हता, हे केवळ नजरचुकीने झाले असून कृपया कुणीही याबाबत कसलाही गैरसमज करून घेऊ नये ही नम्र विनंती करतो.. धन्यवाद..!

**-महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा.



भूमिका

# मोदीशहांनंतर केजरीवाल...

**मोदी-शहांनी देशाचं राजकारण बदलून टाकलं तसं दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनीही ते बदललेलं आहे असं दिसतंय. तिहार तुरुंगातून बाहेर आल्यावर केजरीवालांनी 'इंडिया' आघाडीच्या मुख्यमंत्र्यांना सल्ला देऊन टाकला.**

ईडी-सीबीआयने (म्हणजे भाजपने) तुम्हाला तुरुंगात टाकलं तरी तुम्ही मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची गरज नाही. मीही दिला नाही, तुम्हीही देऊ नका!... केजरीवालांचं म्हणणं होतं की, विरोधी पक्षांच्या मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकून पक्ष फोडण्याचा आणि राज्यातील सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळं 'इंडिया' आघाडीतील मुख्यमंत्र्यांनी नवा मंत्र जपला पाहिजे. काहीही झालं तरी मुख्यमंत्रीपद सोडायचं नाही. 'इंडिया' आघाडीतील सर्वांनाच हा मंत्र आवडलेला दिसतो. झारखंड मुक्ती मोर्चाचे सर्वेसर्वा हेमंत सोरेन यांनी तुरुंगात गेल्यावर मुख्यमंत्रीपद सोडलं होतं पण, जामिनावर सुटल्यावर ते परत घेतलं. आता मात्र विरोधकांपैकी कोणी मुख्यमंत्रीपद सोडण्याची शक्यता दिसत नाही. कर्नाटकमध्ये काँग्रेसचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत, त्यांची कोंडी करण्याचे प्रयत्न होत आहेत. पण, त्यांनी मुख्यमंत्रीपद सोडण्यास ठाम नकार दिला आहे, इतकंच नव्हे तर



काँग्रेसनेही त्यांच्याकडं राजीनामा मागितलेला नाही. सिद्धरामय्यांना मुख्यमंत्रीपदावरून बाजूला न करण्याचा निर्णय बहुधा काँग्रेसने घेतला असावा असं दिसतंय. केजरीवाल तुरुंगात असताना दिल्लीचं मुख्यमंत्रीपद भूषवत होते, तर सिद्धरामय्यांवर नुसते आरोप झाले म्हणून त्यांनी हे पद का सोडायचं, असा विचार काँग्रेसमध्ये केला जात आहे. पूर्वी केंद्रात काँग्रेसचं सरकार असताना आरोप झाले म्हणून अनेकांना मंत्रीपदाला आणि मुख्यमंत्रीपदाला मुकावं लागलं होतं. अलीकडच्या काळात भाजपच्या मंत्र्यांवर आरोप होऊनही त्यांनी राजीनामा दिला नाही, त्यांना पक्षाने पाठीशी घातलं होतं. काळ बदलला, सत्ताधारी बदलले आणि विरोधकही! संसदेच्या स्थायी समित्या अजून बनल्या कशा नाहीत असा प्रश्न विचारला जात होता. अखेर गुरुवारी लोकसभाध्यक्षांनी २४ स्थायी समित्यांची घोषणा केली. त्यापैकी दोन समित्यांचे अध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरे (पेट्रोलियम व नैसर्गिक वायू) आणि शिवसेनेच्या शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे (ऊर्जा) यांना देण्यात आले आहे. ऊर्जाविषयक स्थायी समितीमध्ये सर्वाधिक मराठी खासदार सदस्य आहेत. श्रीरंग बारणे यांच्यासह श्यामकुमार बर्वे, छत्रपती शाहू महाराज, शिवाजी काळगे, नामदेव किरसान, नीलेश लंके, श्रीकांत शिंदे यांचा समावेश करण्यात आलेला आहे. पेट्रोलियम-नैसर्गिक वायूसंबंधी समितीमध्ये सुनील तटकरे आणि चंद्रकांत हंडोरे तर, वाणिज्य समितीमध्ये प्रशांत पडोळे, भागवत कराड, धनंजय महाडिक, रजनी पाटील आहेत. गृहविषयक समितीमध्ये अनिल देसाई, धैर्यशील माने, सुप्रिया सुळे हे तिघे सदस्य आहेत. महिला व बालकल्याण, युवा व क्रीडा समितीमध्ये वर्षा गायकवाड, अमर काळे, सुनेत्रा पवार सदस्य आहेत. उद्योग समितीमध्ये स्मिता वाघ, राजाभाऊ वाजे तर, विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरण, वन व हवामान बदल समितीमध्ये बळवंत वानखेडे आणि शरद पवार सदस्य आहेत. आरोग्य समितीमध्ये संजय देशमुख, शोभा बच्छाव, बाळ्यामामा म्हात्रे, हेमंत सावरा, अजित गोपछडे आहेत. आस्थापना व सार्वजनिक तक्रारसंबंधी समितीमध्ये गोवाल पाडवी आहेत. शेतीसंदर्भातील समितीमध्ये नारायण राणे, भाऊसाहेब वाकचौरे, अनिल बोंडे, नितीन पाटील सदस्य आहेत. माहिती-तंत्रज्ञानासारख्या अत्यंत महत्त्वाच्या समितीमध्ये अनुप धोत्रे, संजय जाधव, प्रियंका चतुर्वेदी सदस्य आहेत. गेल्यावेळी या समितीचे अध्यक्षपद शशी थरूर यांच्याकडे होते. ते भाजपचे निशिकांत दुबे यांच्या आक्षेपानंतर काढून घेतले गेले व ते प्रतापराव जाधव यांना दिले गेले. आता हेच दुबे या समितीचे अध्यक्ष बनले आहेत. संरक्षण समितीमध्ये प्रफुल पटेल व धैर्यशील पाटील आहेत. राहुल गांधीही याच समितीचे सदस्य आहेत. सोनिया गांधी राज्यसभेच्या सदस्य असल्या तरी त्या एकाही स्थायी समितीच्या सदस्य नाहीत! परराष्ट्र धोरणविषयक समितीमध्ये अरविंद सावंत व प्रणिती शिंदे सदस्य आहेत.

## प्रासंगिक »

### न्यायबाह्य!

***सर्वोच्च न्यायालयाच्या या टिप्पणीतून पोलीस चकमकींचे कायदेशीर चौकटीतील स्थान अधोरेखीत होते.***

मुंबईजवळ बदलापूर येथे दोन बालिकांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या पोलीस चकमकीमुळे न्यायालय तसेच राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने चकमकींबाबत घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे खरोखर पालन केले जाते का, हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आ झटपट न्याय मिळवून दिल्याबाबत जनतेकडूनही या चकमकींना एकप्रकारे समर्थन दर्शवले जाते. परंतु, कायद्याच्या अंमलबजावणीची आणि आरोपींना खटल्याला सामोरे जाऊन न्यायालयासमोर दोषी सिद्ध करण्याची जबाबदारी असलेल्या पोलिसांची ही कृती न्यायालय व कायद्याच्या नजरेत कायम बेकायदेशीरच राहिली आहे. कोणत्याही वाईट हेतूने किंवा अप्रामाणिक हेतूने अथवा वैयक्तिक फायद्यासाठी ही कृती करण्यास कायद्याने परवानगी नाही. अर्थात, भारतीय दंड संहितेच्या कलम ९६ ते १०६ अंतर्गत, काही विशिष्ट परिस्थितीत पोलीस चकमकीतील मृत्यू हा गुन्हा मानला.

नेबरहूड फर्स्ट' असे म्हणत 'ॲक्ट इस्ट' हे वाजपेयींचे धोरण आपण पुढे नेत आहोत असे दाखवणारे मोदी सरकार प्रत्यक्षात तसे वागताना दिसते आहे का ? आपण आणि आपला शेजारी देश असलेल्या चीनदरम्यान ३ हजार ४८८ किलोमीटरची सामाईक सीमा आहे, पण कोणीही चीनला आपला शेजारी मानत नाही.

# शेजाऱ्यांवर प्रेम? नको रे बाबा...

अशीच लांबलचक सीमा असलेले आपले आणखी दोन शेजारी म्हणजे पाकिस्तान (३ हजार ३१० किलोमीटर) आणि बांगलादेश (४ हजार ०९६ किलोमीटर). आपण या दोन्ही देशांदरम्यान असलेल्या आपल्या पूर्ण सीमेला कुंपण घातले आहे. नेपाळ आणि भारत यांच्यात 'खुली सीमा' धोरण आहे. काही त्रुटी वगळता, या खुल्या सीमेमुळे दोन्ही देशांदरम्यान वस्तू, सेवा आणि मानवी वाहतूक सुलभपणे चालते. भूतान या आकाराने अगदी लहान असलेल्या पण आपल्या दृष्टीने सामरिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण स्थानी वसलेल्या आणि त्यामुळेच आपल्या दृष्टीने मौल्यवान अशा देशाच्या आणि आपल्या दरम्यान ५७८ किलोमीटरची सीमा आहे. थोड्याशा अरुंद अशा पाल्कच्या सामुद्रधुनीमुळे आणि त्याचबरोबर ऐतिहासिक आणि सांस्कृतिक कारणांमुळे आपल्यापासून दुरावला गेलेला श्रीलंका हा आपल्यासाठी महत्त्वाचा आणि कधीकधी समस्या



निर्माण करणारा शेजारी आहे. मालदीव आपल्यापासून थोड्या अंतरावर आहे पण चीनला न जुमानता आपण त्या देशाशी चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. १९८८ मध्ये बंडखोरांचा एक गट मालदीवला ताब्यात घेऊ पाहात होता. आपण त्यापासून मालदीवला वाचवले. पण हे 'ऑपरेशन कॅक्टस' आता कुणाला आठवत असेल का, हा प्रश्नच आहे. अफगाणिस्तान आणि आपल्या दरम्यान १०६ किलोमीटर्सची छोटीशी सीमा आहे; पण त्यांच्या अशांत देशांतर्गत राजकारणामुळे आपले आणि त्यांचे संबंध 'आहे-नाही' अशा पद्धतीचे राहिले आहेत. चीन वगळता भारत आणि हे सगळे देश सार्क (साऊथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल को ऑपरेशन) या प्रादेशिक गटाचे सदस्य आहेत. आपल्या धोरणांमध्ये या शेजाऱ्यांचे स्थान काय आहे? इंद्रकुमार गुजराल यांनी 'लूक इस्ट' असे धोरण जाहीर केले होते. अटलबिहारी वाजपेयींनी चाणाक्षपणे ते बदलून 'ॲक्ट इस्ट' केले. त्यांच्या धोरणानुसारच पुढे जात नरेंद्र मोदी यांनी 'नेबर्स फर्स्ट' असे त्यांच्या सरकारचे धोरण असल्याची घोषणा केली. शेजारच्या देशांबद्दल पंतप्रधानांचे वैयक्तिक स्वारस्य जाणून घेण्याची मला उत्सुकता होती. मोदींनी सार्कच्या प्रत्येक सदस्य देशाला शेवटची भेट कधी दिली याचा मी शोध घेतला तेव्हा मला पीएमइंडिया ( PMINDIA) या वेबसाइटवर पुढील गोष्टी सापडल्या. गेल्या दहा वर्षांत पंतप्रधानांनी नेपाळला पाच वेळा, भूतानला तीनदा, श्रीलंकेला तीनदा, बांगलादेशला दोनदा, मालदीवला दोनदा, अफगाणिस्तानला दोनदा आणि पाकिस्तानला एकदा भेट दिल्याचं मला आढळलं.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सामंत सलग पाचव्यांदा गड राखणार?

## महाविकास आघाडीकडून कोणाला मिळणार उमेदवारी?

| मुंबई |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रत्नागिरी विधानसभा मतदारसंघ हा रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघाचा एक भाग आहे. शिंदे गटाचे मंत्री उदय सामंत हे रत्नागिरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत. त्यांच्याकडे महायुती सरकारमध्ये सध्या उद्योगमंत्री पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. २०२२ मध्ये शिवसेनेत फुट पडल्यानंतर उदय सामंत हे एकनाथ शिंदे यांच्या बंडात सहभागी झाले. उदय सामंत यांची रत्नागिरी विधानसभा मतदारसंघावर पकड आहे. २०१९ मध्ये सलग चौथ्यांदा ते या मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले.**

उदय सामंत यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून २००४ आणि २००९ ची विधानसभा निवडणूक लढवली होती. या दोन्ही निवडणुकांमध्ये त्यांचा विजय झाला होता. त्यानंतर २०१४ मध्ये त्यांनी राष्ट्रवादीतून शिवसेनेत प्रवेश केला. २०१४ आणि २०१९ ची विधानसभा निवडणूक त्यांनी शिवसेनेकडून लढवली. दोन्ही निवडणुकांमध्ये ते विजयी झाले.२०२४ मध्ये झालेल्या रत्नागिरी – सिंधुदुर्ग लोकसभा निवडणुकीत भाजपचे नेते व केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी ठाकरे गटाचे उमेदवार विनायक राऊत यांचा पराभव केला. उदय सामंत यांच्या रत्नागिरी विधानसभा मतदारसंघातून ठाकरे गटाचे उमेदवार विनायक राऊत यांना ५० हजारांहून अधिक मताधिक्य मिळाले. त्यामुळे रत्नागिरी विधानसभा निवडणुकीत यंदा चुरस पाहायला मिळणार आहे. उदय सामंत यांची महायुतीकडून उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे.२०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना व भाजपा हे पक्ष स्वतंत्रपणे निवडणुकांना सामोरे गेले होते. त्यावेळी भाजपचे बाळ माने यांचा शिवसेनेच्या उदय सामंत यांनी पराभव केला होता. सामंत यांना ९३८७६ मते मिळाली होती, तर माने यांना ५४४४९ मते मिळाली होती. भाजपचे बाळ माने हे १९९९ मध्ये रत्नागिरी विधानसभा मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले होते. त्यानंतर २००४, २००९ आणि २०१४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये उदय सामंत यांनी भाजपच्या बाळ माने यांचा सलग तीन वेळा पराभव केला.

२०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत उदय सामंत हे रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार होते. त्यांची लढत राष्ट्रवादीचे उमेदवार सुदेश मयेकर यांच्याविरोधात झाली. या निवडणुकीत सामंत यांना ११८४८४ मते मिळाली, तर मयेकर यांना केवळ ३११४९ मते मिळाली. ८७ हजारांहून अधिक मताधिक्याने सामंत विधानसभेवर निवडून गेले.महाविकास आघाडीकडून रत्नागिरी विधानसभा मतदारसंघाची जागा ठाकरे गटाला मिळण्याची शक्यता आहे. शिवसेनेतील फुटीनंतर शिवसेनेचे विद्यमान आमदार उदय सामंत हे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत सहभागी झाले. त्यामुळे आगामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत उदय सामंत यांच्याविरोधात प्रबळ उमेदवार देण्याचे आव्हान उद्धव ठाकरे यांच्यापुढे आहे. ठाकरे गटाकडून सहसंपर्कप्रमुख राजेंद्र महाडिक, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष उदय बने व माजी नगराध्यक्ष प्रदीप साळवी इच्छुक आहेत. २०१९ मध्ये सामंत यांच्या विरोधात लढणारे राष्ट्रवादीचे उमेदवार सुदेश मयेकर यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत शिवसेनेत प्रवेश केला आहे. तसेच भाजपाचे माजी आमदार बाळ माने यांनी रत्नागिरी विधानसभा मतदारसंघावर दावा केला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात डोंगराळ भाग मोठ्या प्रमाणात आहे. पश्चिमेकडे अरबी समुद्र आहे.

उत्तरेकडे रायगड जिल्हा आहे. तर पूर्वेकडे सातारा, सांगली, कोल्हापूर हे जिल्हे आहेत. दक्षिणेला सिंधुदुर्ग जिल्हा आहे. आंबा, नारळ, फणस, सुपारी, भात, नाचणी ही प्रमुख पिके रत्नागिरीत घेतली जातात.उदय सामंत यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून २००४ आणि २००९ ची विधानसभा निवडणूक लढवली होती. या दोन्ही निवडणुकांमध्ये त्यांचा विजय झाला होता. त्यानंतर २०१४ मध्ये त्यांनी राष्ट्रवादीतून शिवसेनेत प्रवेश केला. २०१४ आणि २०१९ ची विधानसभा निवडणूक त्यांनी शिवसेनेकडून लढवली. दोन्ही निवडणुकांमध्ये ते विजयी झाले.२०२४ मध्ये झालेल्या रत्नागिरी – सिंधुदुर्ग लोकसभा निवडणुकीत भाजपचे नेते व केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी ठाकरे गटाचे उमेदवार विनायक राऊत यांचा पराभव केला. ठाकरे गटाचे उमेदवार विनायक राऊत यांना ५० हजारांहून अधिक मताधिक्य मिळाले.




### माने यांनी मतदारसंघावर दावा केला

शिवसेनेतील फुटीनंतर शिवसेनेचे विद्यमान आमदार उदय सामंत हे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत सहभागी झाले. त्यामुळे आगामी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत उदय सामंत यांच्याविरोधात प्रबळ उमेदवार देण्याचे आव्हान उद्धव ठाकरे यांच्यापुढे आहे.२०१९ मध्ये सामंत यांच्या विरोधात लढणारे राष्ट्रवादीचे उमेदवार सुदेश मयेकर यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देत शिवसेनेत प्रवेश केला आहे. तसेच भाजपाचे माजी आमदार बाळ माने यांनी रत्नागिरी विधानसभा मतदारसंघावर दावा केला आहे.

# माझ्या अनेक चुका शरद पवारांनी पदरात घेतल्या

## काँग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे यांनी अकलूजमध्ये व्यक्त केली भावना

| मुंबई |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजकीय आयुष्यात अधूनमधून माझ्या हातून चुका झाल्या. परंतु प्रत्येक वेळी शरद पवार यांनी या चुका पदरात घेतल्या. आम्ही दोघे वेगवेगळ्या पक्षात राहूनही पवारांनी मला कधीही अंतर दिले नाही. मी पुढे जात असताना कधीही मागे खेचले नाही. यशवंतराव चव्हाण यांच्यापेक्षा काकणभर जास्त त्यांनी माझ्यावर प्रेम केले आणि प्रोत्साहन दिले, असे भावोद्गार काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी काढले.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते झाला. त्यावेळी शिंदे यांनी आपल्या राजकीय आयुष्याचा पट उलगडून दाखवत पवार यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील, कोल्हापूरचे छत्रपती, खासदार शाहू महाराज, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आदींची प्रमुख उपस्थित होती. लोकसभा निवडणुकीत निवडून आलेल्या महाविकास आघाडीच्या राज्यातील सर्व नवनिर्वाचित खासदारांनाही सन्मानित करण्यात आले. या निमित्ताने हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत महाविकास आघाडीचे मोठे शक्तिप्रदर्शन अकलूजमध्ये पाहावयास मिळाले. सुशीलकुमार शिंदे सत्कार समारंभ समितीच्या माध्यमातून या समारंभास सर्वपक्षीय स्वरूप देण्यात आले तरी प्रत्यक्षात महाविकास आघाडीने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी रणसंग्राम फुटल्याचे पाहावयास मिळाले. सत्कार समारंभ समितीचे प्रमुख, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी प्रास्ताविक तर त्यांचे चुलत बंधू असलेले भाजपचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी स्वागत केले. हाआवर्जून उल्लेख केला. तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात आपणास महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद सांभाळण्यास सांगितले गेले होते.



### त्यांनी आपले पाय जमिनीवर ठेवले

परंतु नंतर ही जबाबदारी शरद पवार यांच्याकडे सोपविण्यात आली. त्याचा घटनाक्रमही शिंदे यांनी कथन केला. त्याच सुमारास शरद पवार यांनी काँग्रेस पक्ष सोडला नसता तर ते पंतप्रधान झाले असते, असेही शिंदे यांनी सांगून टाकले.सुशीलकुमार शिंदे यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडताना शरद पवार म्हणाले, सत्ताकारणात सुशीलकुमारांनी माझ्यापेक्षा जास्त सत्तापदे मिळविली. परंतु त्यांनी सत्ता कधीही डोक्यात जाऊ दिली नाही. त्यांनी आपले पाय सदैव जमिनीवर ठेवले. हेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे मोठे यश आहे, असे गौरवोद्गार पवार यांनी काढले

# पाकिस्तान त्यांच्या कर्माची फळं भोगतोय

## पाकिस्तानला परिणाम भोगावे लागतील : एस.जयशंकर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी शनिवारी (२८ सप्टेंबर) पाकिस्तानबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. ते म्हणाले, “पाकिस्तानबरोबरचा पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा आपल्याला सोडवायचा आहे. त्यांना पाकव्याप्त काश्मीर रिकामं करायला लावण्याचा मुद्दा अद्याप बाकी आहे. सीमेपलीकडे पाकिस्तान दहशतवादी धोरणं राबवत आहे, मात्र ते त्यात कधीच यशस्वी होणार नाहीत. त्यांच्या प्रत्येक कृतीचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील. आजही ते त्यांच्या कर्माची फळं भोगत आहेत”. जयशंकर यांनी शनिवारी संयुक्त राष्ट्र महासभेच्या म्हणजेच यूएनजीएच्या ७९ व्या सत्राला संबोधित केलं.**



एस जयशंकर म्हणाले, “भारत व पाकिस्तानमधील केवळ एकच मुद्दा सोडवणं बाकी आहे. तो म्हणजे पाकिस्तानने बेकायदेशीरमध्ये बळकावलेला काश्मीरचा भाग त्यांना रिकामा करायला लावायचा आहे. तो भारताचा भूभाग आहे. तसेच सीमेपलीकडून भारताविरोधात होत असलेल्या दहशतवादी कारवायांचा कायमचा बंदोबस्त करायचा आहे”.भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणाले, “पाकिस्तान त्यांच्या कर्माची फळं भोगतोय. त्यांचं ‘कर्म’ आज त्यांच्याच समाजाला गिळंकृत करत आहे. काही देश त्यांच्या नियंत्रणात नसलेल्या शक्तींमुळे किंवा परिस्थितीमुळे मागे राहिले आहेत. परंतु, काही देश असेही आहेत जे स्वतःच्या चुकांमुळे मागे राहिले. ज्यांनी जाणूनबुजून असे निर्णय घेतले की जे त्यांच्या देशासाठी घातक ठरले. याचं सर्वात मोठं उदाहरण म्हणजे आमचा शेजारी देश पाकिस्तान”. एस. जयशंकर म्हणाले, “आम्ही काल याच मंचावरून काही चुकीच्या गोष्टी ऐकल्या. त्यामुळे मला भारताची भूमिका स्पष्ट करायची आहे. सीमेपलीकडील दहशतवादाचे पाकिस्तानचे धोरण कधीच यशस्वी होणार नाही. याची त्यांना शिक्षा मिळेल. ते त्या शिक्षेपासून स्वतःचा बचाव करू शकणार नाहीत. त्यांच्या कृतीचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील.भारत आणि पाकिस्तानमध्ये आता केवळ एकच मुद्दा सोडवणं बाकी आहे. पाकिस्तानने बेकायदेशीरपणे भारताची जमीन बळकावली आहे. पाकिस्तानने बळकावलेला काश्मीरचा भाग त्यांनी मोकळा करावा. दहशतवाद आणि त्यांच्या संघटनांबरोबरचे संबंध संपुष्टात आणावेत. दहशतवाद हा जगातील कोणत्याही समाजाच्या, धर्मांच्या शिकवणीच्या विरोधात आहे”.एस जयशंकर म्हणाले, “भारत व पाकिस्तानमधील केवळ एकच मुद्दा सोडवणं बाकी आहे. तो म्हणजे पाकिस्तानने बेकायदेशीरमध्ये बळकावलेला काश्मीरचा भाग त्यांना रिकामा करायला लावायचा आहे. तो भारताचा भूभाग आहे. तसेच सीमेपलीकडून भारताविरोधात होत असलेल्या दहशतवादी कारवायांचा कायमचा बंदोबस्त करायचा आहे”.भारताचे परराष्ट्रमंत्री म्हणाले, “पाकिस्तान त्यांच्या कर्माची फळं भोगतोय. त्यांचं ‘कर्म’ आज त्यांच्याच समाजाला गिळंकृत करत आहे. काही देश त्यांच्या नियंत्रणात नसलेल्या शक्तींमुळे किंवा परिस्थितीमुळे मागे राहिले आहेत. परंतु, काही देश असेही आहेत जे स्वतःच्या चुकांमुळे मागे राहिले. ज्यांनी जाणूनबुजून असे निर्णय घेतले की जे त्यांच्या देशासाठी घातक ठरले. याचं सर्वात मोठं उदाहरण म्हणजे आमचा शेजारी देश पाकिस्तान”. एस. जयशंकर म्हणाले, “आम्ही काल याच मंचावरून काही चुकीच्या गोष्टी ऐकल्या. त्यामुळे मला भारताची भूमिका स्पष्ट करायची आहे. सीमेपलीकडील दहशतवादाचे पाकिस्तानचे धोरण कधीच यशस्वी होणार नाही. याची त्यांना शिक्षा मिळेल. ते त्या शिक्षेपासून स्वतःचा बचाव करू शकणार नाहीत. त्यांच्या कृतीचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील.भारत आणि पाकिस्तानमध्ये आता केवळ एकच मुद्दा सोडवणं बाकी आहे. पाकिस्तानने बेकायदेशीरपणे भारताची जमीन बळकावली आहे. पाकिस्तानने बळकावलेला काश्मीरचा भाग त्यांनी मोकळा करावा. दहशतवाद आणि त्यांच्या संघटनांबरोबरचे संबंध संपुष्टात आणावेत.

### केवळ एकच मुद्दा सोडवणं बाकी

दहशतवाद हा जगातील कोणत्याही समाजाच्या, धर्मांच्या शिकवणीच्या विरोधात आहे”.भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी शनिवारी (२८ सप्टेंबर) पाकिस्तानबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. ते म्हणाले, “पाकिस्तानबरोबरचा पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा आपल्याला सोडवायचा आहे. त्यांना पाकव्याप्त काश्मीर रिकामं करायला लावण्याचा मुद्दा अद्याप बाकी आहे. सीमेपलीकडे पाकिस्तान दहशतवादी धोरणं राबवत आहे, मात्र ते त्यात कधीच यशस्वी होणार नाहीत. त्यांच्या प्रत्येक कृतीचे परिणाम त्यांना भोगावेच लागतील. आजही ते त्यांच्या कर्माची फळं भोग आहेत”. जयशंकर यांनी शनिवारी संयुक्त राष्ट्र महासभेच्या म्हणजेच यूएनजीएच्या ७९ व्या सत्राला संबोधित केलं.


# पाकिस्तानला आयएमएफपेक्षा जास्त पैसा दिला

## जम्मू काश्मीरला विकासासाठी पैसे देते : राजनाथ सिंह

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू काश्मीरच्या गुरेज येथील प्रचारसभेत बोलताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा उल्लेख करत मोठं विधान केलं आहे. पाकिस्तानने दहशतवाद बाजुला ठेऊन भारताशी मैत्री केली असती, तर भारताने त्यांना आयएमएफपेक्षा अधिक पैसा दिला असता, असे ते म्हणाले. तसेच पाकिस्तानबरोबर मैत्री करण्यासाठी भारताने केलेल्या विविध प्रयत्नांचा उल्लेखही त्यांनी यावेळी केला.**



दरम्यान, त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांनाही उधाण आलं आहे. भारत सरकार जम्मू काश्मीरला विकासासाठी पैसे देते, तर पाकिस्तान त्यांना मिळत असलेल्या पैशांचा दुरुपयोग करत दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न करतो. पाकिस्तान त्यांच्या देशात दहशतवादाचा कारखाना चालवतो. त्यासाठी इतर देशांकडून पैसे मागतो. भारताविरोधात दहशतवादाचा शस्त्र म्हणून वापर करणारा पाकिस्तान आता आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाकी पडला आहे. पाकिस्तानचे काही विश्वासू मित्र देशही त्यांच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे त्यांची अर्थव्यवस्था डबघाईला आली आहे. खरं तर पाकिस्तानने दहशतवाद बाजुला ठेऊन भारताशी मैत्री केली असती, तर भारताने त्यांना आयएमएफपेक्षा अधिक पैसा दिला असता.

### पाकिस्तानने दहशतवादाला प्रोत्साहन दिले

“भारताने नेहमीच पाकिस्तानच्या दिशेने मैत्रीचा हात पुढे केला आहे. अटलबिहारी वाजपेयी असतील किंवा नरेंद्र मोदी असतील त्यांनी पाकिस्तानशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. मात्र, पाकिस्तानने नेहमीच दहशतवादाला प्रोत्साहन दिले”, असे ते म्हणाले.दरम्यान, “केंद्रातील मोदी सरकारने २०१४-२०१५ मध्ये जम्मू-काश्मीरमधील विकासकामांना गती देण्यासाठी विशेष पॅकेज घोषणा केली होती. सरकारने हा निधी जवळपास ९० हजार कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे. मुळात पाकिस्तानने आयएमएफला जितके पैसे मागितले, त्यापेक्षा जास्त पैसे आम्ही जम्मू काश्मीरला दिले.

# कंगनाच्या कानशिलात मारणारीला दिली नोकरीची ऑफर

हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून निवडून आलेल्या नवनिर्वाचित खासदार कंगना रणौत यांना गुरुवारी चंदीगड विमानतळावर सीआयएसएफ कॉन्स्टेबर कुलविंदर कौरने कानशिलात लगावली. यावेळी कंगना चंदीगढहून दिल्लीला जात होत्या. पण त्यांनी शेतकऱ्यांसंदर्भात वक्तव्य केल्यामुळे कुलविंदर कौर व कंगनात वाद सुरू झाले आणि यावेळीच अभिनेत्रीच्या कानशिलात दिल्याचा प्रकार घडला. सध्या या प्रकरणावर बॉलीवूड सेलिब्रिटी प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. काही सेलिब्रिटींनी कंगना यांना पाठिंबा दर्शवला आहे. पण प्रसिद्ध संगीतकार, गायक विशाल ददलानीने स्वतःची एक वेगळी भूमिका याविषयी मांडली आहे. विशाल ददलानीने इन्स्टाग्राम स्टोरीवर या घटनेचा व्हिडीओ शेअर केला आणि लिहिलं, “मी कधीच हिंसेचं समर्थन करत नाही, पण या सीआयएसएफ कर्मचाऱ्याचा राग मी समजू शकतो. सीआयएसएफने तिच्यावर कोणतीही कारवाई झाल्यास, तिला काम मिळवून देण्याचा मी प्रयत्न करेन. जय हिंद. जय जवान. जय किसान.” तसंच त्यानं पुढच्या स्टोरीमध्ये लिहिलं होतं, “जर मिस कौरला नोकरीवरून काढून टाकण्यात आलं असेल, तर कृपया कोणीतरी तिचा माझ्याशी संपर्क करून द्या आणि मी तिला नोकरी मिळेल याची खात्री करेन.”विशाल ददलानीच्या याच भूमिकेवरून प्रसिद्ध गायिका सोना मोहपात्रा एक्सवर पोस्ट करत म्हणाली, “एखाद्या चुकीच्या गोष्टींविरोधात भूमिका घेणारा तो (विशाल ददलानी) अनेक आरोप असलेल्या गैरवर्तन करणाऱ्या अनु मलिकसारख्या लोकांच्या शेजारी बसतो आणि जेव्हा माझ्यासारखे सहकारी त्याला रिॲलिटी शोच्या टॉक्सिक कल्चरबद्दल बोलायला सांगतात. तेव्हा म्हणतो, पैसे कमवून देशातून निघायचं आहे.”दरम्यान, कंगना रणौत यांना सीआयएसएफ कॉन्स्टेबर कुलविंदर कौर यांनी लगावलेल्या कानशिल प्रकरणात अभिनेत्री रवीना टंडन पासून शबाना आझमीपर्यंत सगळ्यांनी अभिनेत्रीला पाठिंबा दिला आहे. याशिवाय कंगना यांचा एक्स बॉयफ्रेंड अध्ययन सुमनने याप्रकरणी भाष्य केलं आहे. कुलविंदर कौर व कंगनात वाद सुरू झाले आणि यावेळीच अभिनेत्रीच्या कानशिलात दिल्याचा प्रकार घडला. सध्या या प्रकरणावर बॉलीवूड सेलिब्रिटी प्रतिक्रिया देताना दिसत आहेत. काही सेलिब्रिटींनी कंगना यांना पाठिंबा दर्शवला आहे.

## मुंबईकर झाली तृप्ती डिमरी

रणबीर कपूरच्या ‘ॲनिमल’ चित्रपटात दमदार अभिनयासाठी प्रेक्षकांकडून कौतुक मिळवणारी तृप्ती डिमरी हिने आता मुंबईत घर घेतलं आहे. ‘ॲनिमल’ मध्ये एक छोटीशी भूमिका करून नॅशनल क्रश ठरलेली तृप्ती आता मुंबईतील वांद्रे भागात एका सुंदर घराची मालकीण झाली आहे. अनेक बॉलीवूड सेलिब्रिटी राहत असलेल्या वांद्रेमध्ये आता तृप्तीने घर घेतलं आहे, तिच्या घराची किंमत व इतर तपशील समोर आले आहेत. ‘इंडेक्सटॅप.कॉम’ या वेबसाइटवर तृप्ती डिमरीच्या नवीन घराच्या नोंदणीसंदर्भात माहिती देण्यात आली आहे. मालमत्तेच्या नोंदणीच्या कागदपत्रांनुसार तृप्तीने स्वतःसाठी तब्बल १४ कोटी रुपयांचे घर विकत घेतले आहे. नवीन घर घेतल्यावर तृप्ती बॉलीवूडमधील काही दिग्गज बॉलीवूड सेलिब्रिटींच्या शेजारी राहणार आहे.तृप्तीचा आलिशान बंगला कार्टर रोडजवळ आहे. या भागातच शाहरुख खान, सलमान खान, रेखा यांसारखे बॉलीवूड स्टार राहतात. रणबीर कपूर आणि आलिया भट्ट देखील याच परिसरात राहतात. तृप्तीचे नवीन घर दोन मजली आहे. तिच्या घराचे एकूण क्षेत्रफळ २२२६ चौरस फूट आहे. या घरासाठी तृप्तीने ७० लाख रुपये मुद्रांक शुल्क आणि ३० हजार रुपये नोंदणी शुल्क भरले आहे, असा दावा अहवालात करण्यात आला आहे. तृप्तीच्या नवीन घराच्या या व्यवहाराची नोंदणी ३ जून रोजी झाली होती.तृप्ती ही मूळची उत्तराखंड येथील गढवालची आहे. तिने २०१७ मध्ये श्रीदेवी यांच्या ‘मॉम’ व सनी देओलचा ‘पोस्टर बॉईज’ यांसारख्या चित्रपटांतून अभिनयात पदार्पण केलं. पण साजिद अलीच्या ‘लैला मजनू’ मुळे तिला लोकप्रियता मिळाली. त्यानंतर २०२० मध्ये आलेला ‘बुलबुल’ हा तिचा चित्रपट हिट ठरला होता. मग ती अन्विता दत्तच्या ‘कला’ सिनेमात मुख्य भूमिकेत झळकली होती, या चित्रपटातील तिच्या अभिनयाचं खूप कौतुक झालं होतं.रणबीर कपूरच्या ‘ॲनिमल’ चित्रपटात तृप्तीने झोया ही भूमिका साकारली होती. या चित्रपटाने तिला रातोरात स्टार केलं आणि ती नॅशनल क्रश बनली.



## तू फक्त मातीच खा”, शिखरेंचा नुपूरला टोला

आमिर खानचा जावई आणि सुप्रसिद्ध फिटनेस ट्रेनर नुपूर शिखरे सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. बऱ्याचदा नुपूर सोशल मीडियावरील ट्रेंड्स फॉलो करून त्यावर रील बनवत असतो, अनेकदा त्याच्या रील्समध्ये त्याची आई प्रितम शिखरे यादेखील असतात. या माय-लेकांचे मजेदार रील्स चाहत्यांना खूप आवडतात. नुपूरने आता असेच एक रील इन्स्टाग्रामवर शेअर केले आहेत. यात नुपूरच्या काही कृती आणि त्यावर आईंचे टोमणे पाहायला मिळतात. मुलांनी काही म्हटलं की बऱ्याच आईंचे त्यावर टोमणे ठरलेले असतात, तसंच काहीसं या व्हिडीओमध्ये दाखवण्यात आलं आहे. नुपूर व प्रितम शिखरे यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत असून अनेक मराठी सेलिब्रिटींनी यावर कमेंट्सदेखील केल्या आहेत.व्हिडीओत दिसतंय की प्रितम शिखरे बिस्किट खात असतात आणि तिथे नुपूर येतो, त्याला त्या ऑफर करतात. पण नुपूर ‘मी हे सगळं खात नाही’ असं म्हणत नकार देतो, त्यावर ‘तू फक्त मातीच खा’ असा टोला प्रितम शिखरे लगावतात. त्यानंतर नंतरच्या सीनमध्ये नुपूर पुशअप मारत असतो, तिथे प्रितम येतात आणि ‘पुशअप मारतोय, साधं बरणीचं झाकण उघडता येत नाही,’ असं म्हणतात.

## कार्तिक आर्यनच्या कारमध्ये उंदीर घुसले

कार्तिक आर्यन सध्या त्याचा आगामी चित्रपट ‘चंदू चॅम्पियन’ च्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आपल्या दमदार अभिनयासाठी लोकप्रिय असलेल्या कार्तिकला लक्झरी गाड्यांची खूप आवड आहे. त्याच्याकडे कोट्यवधी रुपये किमतीच्या गाड्या आहेत, यापैकी एका गाडीचा किस्सा त्याने सांगितला आहे. २०११ मध्ये ‘प्यार का पंचनामा’ मधून करिअरची सुरुवात करणारा कार्तिक आत्तापर्यंत अनेक चित्रपटांमध्ये झळकला आहे. त्याचा ‘भूल भुलैया २’ हा चित्रपट २०२२ मध्ये रिलीज झाला होता. करोना नंतरच्या काळात सिनेमागृहे पुन्हा उघडल्यानंतर जे मोजकेच चित्रपट हिट झाले होते, त्यापैकी एक कार्तिकचा हा सिनेमा होता. हा चित्रपट ब्लॉकबस्टर झाल्यानंतर, टी-सीरीजचे मालक भुषण कुमार यांनी कार्तिक आर्यनला ४.७ कोटी रुपयांची मॅक्लारेन जीटी कार भेट दिली होती, त्याच कारशी संबंधित हा किस्सा आहे.कार्तिकला भुषण कुमार यांनी ही कार भेट केल्यावर त्याने ती काही काळ चालवली होती, मग ती गॅरेजमध्ये पार्क केली होती.‘द लल्लनटॉप’ला दिलेल्या मुलाखतीत कार्तिक म्हणाला, “मी ही कार गॅरेजमध्ये पार्क केली होती, पण तिचे मॅट्स उंदरांनी कुरतडले, त्यामुळे मी बराच काळ ती कार वापरू शकलो नाही. मी दुसरी कार वापरत होतो. मॅक्लारेन जीटी कारमधील कुरतडलेले मॅट्स दुरुस्त करून घेण्यासाठी मला लाखो रुपये मोजावे लागले होते.”भुषण कुमार यांनी कार्तिकला भेट दिलेली मॅक्लारेन जीटी ही या ब्रँडची भारतातील पहिली कार होती. ही केशरी रंगाची कार आहे. ही एक सुपर कार आहे. या कारचा ताशी वेग ३२६.७ किलोमीटर आहे. ती ३.१ सेकंदात एका किमीवरून १०० किमी वेग गाठू शकते. कार्तिकने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर या कारचे बरेच फोटो शेअर केले आहेत.‘भूल भुलैया २’ आधी कार्तिक आणि भुषण यांनी पहिल्यांदा ‘सोनू के टीटू की स्वीटी’ या हिट चित्रपटात एकत्र काम केलं होतं. हा चित्रपट २०१८ मध्ये आला होता. ‘भूल भुलैया २’ च्या यशानंतर त्यांनी क्रिती सेनॉन व कार्तिकबरोबर ‘शेहजादा’ बनवला



## सूरज व निक्की पहिल्या फेरीत सेफ

बिग बॉस मराठीच्या पाचव्या पर्वात या आठवड्यात घरातील सर्व ८ सदस्य नॉमिनेटेड होते. सूरज चव्हाण, निक्की तांबोळी, वर्षा उसगांवकर, अभिजीत सावंत, पंढरीनाथ कांबळे, अंकिता वालावलकर, धनंजय पोवार आणि जान्हवी किल्लेकर या सर्व स्पर्धकांपैकी पहिल्या दोन राउंडमध्ये सूरज चव्हाण, निक्की तांबोळी, वर्षा उसगांवकर, अभिजीत सावंत सुरक्षित झाले.‘फुलवंती’ चित्रपटाच्या प्रमोशनसाठी प्राजक्ता माळी व गश्मीर महाजनी बिग बॉसच्या घरात आले होते. या दोघांनी स्पर्धकांना एक डान्स टास्क दिला. त्यानंतर घरातून बाहेर पडताना सुरक्षित सदस्यांच्या नावाची घोषणा केली. प्राजक्ता माळीने सूरज चव्हाण सुरक्षित असल्याचं सांगितलं. तर गश्मीर महाजनीने निक्की सुरक्षित असल्याची घोषणा केली. निक्की सुरक्षित होताच अरबाज पटेलने प्रतिक्रिया दिली आहे.अरबाजने इन्स्टाग्राम ब्रॉडकास्ट चॅनलवर एक व्हॉइस नोट शेअर करून निक्कीला सुरक्षित केल्याबद्दल चाहत्यांचे आभार मानले आहेत.

# ब्रुकने मोडला 'विराट'चा वर्ल्ड रेकॉर्ड

## ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या इतक्या धावा करत रचला विक्रम

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ५ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत हॅरी ब्रूकला प्रथमच इंग्लंड एकदिवसीय संघाचा कर्णधार बनवण्यात आले आणि त्याने कर्णधार म्हणून पहिल्याच एकदिवसीय मालिकेत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या एकदिवसीय मालिकेत हॅरी ब्रूकने ऑस्ट्रेलियाविरुद्ध इतक्या धावा केल्या की त्याने विराट कोहलीचा विश्वविक्रम मोडला आणि त्याला मागे टाकत पुढे गेला. हॅरी ब्रूकने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पाचव्या एकदिवसीय सामन्यात ही कामगिरी केली.**





हॅरी ब्रूकने ५ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या सामन्यात ब्रिस्टलमध्ये कांगारू संघाविरुद्ध वेगवान खेळी खेळली आणि त्याने ५२ चेंडूत ७ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने ७२ धावा केल्या. या खेळीनंतर त्याने विराट कोहलीचा ५ वर्षे जुना विश्वविक्रम मोडला. हॅरी ब्रूकने कांगारू संघाविरुद्धच्या या ५ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत एकूण ३१२ धावा केल्या आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या द्विपक्षीय एकदिवसीय मालिकेत सर्वाधिक धावा करणारा कर्णधार बनला.विराट कोहलीने २०१९ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या द्विपक्षीय एकदिवसीय मालिकेत कर्णधार म्हणून ३१० धावा केल्या होत्या, परंतु ब्रूकने २०२४ साली या संघाविरुद्ध कर्णधार म्हणून ३१२ धावा करून कोहलीला मागे टाकत पहिले स्थान पटकावले. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर एमएस धोनी आहे, ज्याने कर्णधार म्हणून २००९ मध्ये कांगारू संघाविरुद्धच्या द्विपक्षीय एकदिवसीय मालिकेत एकूण २८५ धावा केल्या होत्या, तर चौथ्या क्रमांकावर इयॉन मॉर्गन आहे, ज्याने २०१५ मध्ये कर्णधार म्हणून कांगारूविरुद्ध २७८ धावा केल्या होत्या.आता इंग्लंडचा हॅरी ब्रूक ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या द्विपक्षीय एकदिवसीय मालिकेत सर्वाधिक धावा करणारा कर्णधार बनला आणि त्याने मॉर्गनला मागे टाकले. कर्णधार म्हणून बाबर आझमने २०२२ साली कांगारू संघाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत एकूण २७६ धावा केल्या होत्या.मिचेल स्टार्कच्या गोलंदाजीला सामोरे जायचं म्हटलं की, काही अपवाद वगळता जगभरातील फलंदाजांना धडकी भरते. मिचेलचा वेग आणि स्विंगसमोर भल्याभल्यांची भंबेरी उडते. मात्र इंग्लंडचा फलंदाज लियाम लिविंगस्टोन याने स्टार्क नावाचे दडपणच झुगारुन लावले. त्याने स्टार्कच्या षटकात तब्बल २८ धावा फटकावल्या. या खेळीमुळे स्टार्कच्या नावावर एक लाजिरवाणा विक्रमाची नोंद झालीआहे. तो ऑस्ट्रेलियाच्या वनडे क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात महागडे षटक टाकणारा गोलंदाज ठरला आहे.मिचेल स्टार्कच्या आधी ऑस्ट्रेलियन एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात महागडे षटक टाकण्याचा विक्रम झेवियर डोहर्टीच्या नावावर होता, ज्याने 2013 मध्ये भारताविरुद्ध एका षटकात 26 धावा दिल्या होत्या. झेवियर डोहर्टीशिवाय कॅमेरून ग्रीन आणि अ‍ॅडम झाम्पा यांनीही एका षटकात २६-२६ धावा दिल्या आहेत. पण आता क्रिकेटचा मक्का म्हटल्या जाणाऱ्या लॉर्डसच्या ऐतिहासिक मैदानावर इंग्लंडविरुद्ध मिचेल स्टार्कच्या नावावर या विक्रमाची भर पडली आहे.इंग्लंडच्या डावातील शेवटचे षटक टाकण्यासाठी आलेल्या स्टार्कने २८ धावा दिल्या आणि ऑस्ट्रेलियन वनडे क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात महागडे षटक टाकणारा गोलंदाज ठरला. लियाम लिव्हिंगस्टोनच्या स्फोटक फलंदाजीमुळे स्टार्कच्या नावावर हा लज्जास्पद विक्रमाची नोंद झाली आहे. लियाम लिव्हिंगस्टोन याने स्टार्कच्या षटकात ४ षटकारांसह १ चौकार लगावला.ऑस्ट्रेलिया-इंग्लंड वनडे मालिकेतील चौथ्या सामना लॉर्ड्सवर खेळला गेला. पावसामुळे सामन्यात व्यत्यय आला. ५० षटकांचा सामना ३९ षटकांवर आला. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ५ गडी गमावत ३१२ धावा केल्या. कर्णधार हॅरी ब्रूकसह लिव्हिंगस्टोनने दमदार फलंदाजीचे प्रदर्शन केले. ब्रूकने ५८ चेंडूत ११ चौकार आणि १ षटकार लगावत सर्वाधिक 87 धावांची खेळी केली, तर लिव्हिंगस्टोनने केवळ २७ चेंडूत तडाखेबाज ६२ धावा फटकावल्या. तो नाबाद राहिला. लिव्हिंगस्टोनने आपल्या ६२ धावांच्या खेळीत ३ चौकार आणि ७ षटकार लगावले. ३१३ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ केवळ १२६ धावांतच तंबूत परतला. संघाला इंग्लंडकडून १८६ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. ऑस्ट्रेलियाचे सात फलंदाज दुहेरी आकडाही गाठू शकले नाहीत.

### जोफ्रा आर्चरने दोन बळी घेतले


हॅरी ब्रूकने ५ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या सामन्यात ब्रिस्टलमध्ये कांगारू संघाविरुद्ध वेगवान खेळी खेळली आणि त्याने ५२ चेंडूत ७ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने ७२ धावा केल्या. यामध्ये स्टीव्ह स्मिथ (5), जोश इंग्लिस (8), मार्नस लॅबुशेन (4), ग्लेन मॅक्सवेल (2), स्टार्क (3*) यांचा समावेश आहे. अ‍ॅडम झाम्पा आणि हेजलवूड यांना खातेही उघडता आले नाही. वनडे क्रिकेटच्या इतिहासातील धावांच्या बाबतीत ऑस्ट्रेलियाचा हा चौथा सर्वात मोठा पराभव ठरला आहे. इंग्लंडच्या मॅथ्यू पॉट्सने चार बळी घेतले. तर ब्रेडन कारसेने तीन आणि जोफ्रा आर्चरने दोन बळी घेतले.

# भारत-बांगलादेश दुसरा कसोटी सामना ड्रॉ ?

## पाऊस नसतानाही तिसऱ्या दिवसाचा खेळ का केला रद्द?

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत वि बांगलादेश यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसरा सामना कानपूर येथे खेळवला जात आहे. या सामन्यावर सुरूवातीपासूनच पावसाचे संकट होते आणि या कसोटी सामन्याला पावसाचा फटका बसलेला पाहायला मिळत आहे. ग्रीन पार्क स्टेडियम येथे सुरू असलेल्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवसाचा खेळही रद्द करण्यात आला आहे. कानपूर येथे सकाळपासून पाऊस नसूनही तिसऱ्या दिवसाचा खेळ झाला नाही.**



२७ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याचा आज रविवार हा तिसरा दिवस होता. तिसऱ्या दिवशी पाऊस नसतानाही एकही चेंडू न टाकता सामना रद्द करण्यात आला. कारण, आऊटफिल्ड ओली असल्याने तिसऱ्या दिवसाचा खेळ अखेरीस रद्द करावा लागला. रविवारी पाऊस पडण्याची चिन्हे नव्हती पण आऊटफिल्ड ओली असल्याने सामना वेळेत सुरू झाला नाही. पहिल्यांदा १० वाजता, मग दुपारी १२ वाजता आणि २ वाजता मैदानाची पाहणी केल्यानंतर मैदान खेळण्याजोगे तयार नव्हते आणि यामुळे पंचांनी तिसऱ्या दिवसाचा खेळ रद्द केला. कानपूर कसोटीच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी सकाळी १० वाजता पाऊस थांबला पण दुपारी २ वाजता खेळ रद्द झाल्याचे जाहीर केले. तिसऱ्या दिवशी, पाऊस पडला नाही पण आऊटफिल्ड ओली असल्याने खेळ सुरू होऊ शकला नाही. पाऊस नसतानाही, खराब ड्रेनेज सिस्टीममुळे मैदानावर काही ठिकाणी ओलसर भाग तसाच होता.

### तिसऱ्या दिवसाचा खेळ रद्द

दुसऱ्या कसोटीत आतापर्यंत केवळ ३५ षटके टाकण्यात आली आहेत. बांगलादेशने पहिल्या दिवशी ३ बाद १०७ धावांपर्यंत मजल मारली आणि त्यानंतर आलेल्या पावसाने खेळ रद्द केला. दुसऱ्या दिवशी, शनिवारी एकही चेंडू न टाकता खेळाडू पुन्हा हॉटेलवर परतले आणि रविवारीही तीच परिस्थिती कायम होती. ग्रीन पार्कमधील चांगली ड्रेनेज सिस्टीम आणि पायाभूत सुविधा नसल्याने कसोटीचा तिसऱ्या दिवसाचा खेळ रद्द करण्यात आला.